ePaper **माझ्या पक्षातील लोकांचा मोठेपणा...: सुनेत्रा पवार**



॥ वर्ष - 7 । अंक - 345 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 15 जून 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- इंग्लंडचा ओमानवर ऐतिहासिक विजय
- ‘पुष्पा २’ला टक्कर द्यायला येतोय ‘स्त्री २’
- मेलोनींनी मोदींना केलेलं ‘नमस्ते’ चर्चेत!
- राज ठाकरेंनी शिवसेना सोडून चूक केली

## अखेर अजित पवार यांची कबुली...

# कांद्यानेच केला 4 जिल्ह्यांत वांदा!

### लोकसभा निवडणुकीत नाशिक, पुणे, नगर, सोलापूर जिल्ह्यांत महायुतीला फटका

। पुणे ।महाईन्यूज

**ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर कांदा प्रश्नाने डोके वर काढले होते. या प्रश्नी कांदा उत्पादक आणि ग्राहक या दोन्ही घटकांचे समाधान होईल, असा तोडगा काढावा, असे केंद्राला कळविले होते. मात्र, समाधानकारक तोडगा न निघाल्याने लोकसभा निवडणुकीत नाशिक, पुणे, नगर आणि सोलापूर या चार जिल्ह्यांत महायुतीला फटका बसल्याची कबुली राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी दिली.**



पुणे दौऱ्यावर उपमुख्यमंत्री पवार पत्रकारांशी बोलताना म्हणाले, ‘जळगाव, नाशिक, पुणे, नगर आणि सोलापूर जिल्ह्यातील अनेक शेतकरी कांदा उत्पादन घेतात. कांदा प्रश्न पेटल्यानंतर कांदा उत्पादकांमध्ये नाराजी होती. त्यामुळे कांदा उत्पादक आणि ग्राहक या दोन्ही घटकांचे समाधान होईल, असा तोडगा काढण्याबाबत केंद्राला आम्ही सांगितले होते. मात्र, तोडगा न निघाल्याने उत्तर महाराष्ट्रातील जळगाव आणि रावेर वगळता नाशिक, पुणे, नगर आणि सोलापूर येथील जागांवर महायुतीला फटका बसला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शपथविधीसाठी मी दिल्ली येथे गेलो होतो. तेव्हा अमित शहा आणि पियुष गोयल यांना देखील याची कल्पना देण्यात आली.’

दरम्यान, लोकसभा निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर प्रत्येक जण आपापल्या पद्धतीने त्याचे विश्लेषण करत आहे. लोकशाहीत प्रत्येकाला आपापली मते मांडण्याचा अधिकार आहे. त्यामुळे यावर आता काही बोलणार नाही, अशा शब्दांत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबाबतच्या प्रश्नावर उपमुख्यमंत्री पवार यांनी अधिक बोलणे टाळले.

### भुजबळ नाराज असल्याचे धादांत खोटे

राज्यसभा निवडणुकीत उमेदवारी देण्यावरून छगन भुजबळ नाराज असल्याचे धादांत खोटे आहे. यावर पक्षाचे वरिष्ठ नेते प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे आणि स्वत: भुजबळ यांनी नाराज नसल्याचे सांगितले आहे. तरीदेखील माध्यमांतून अशाप्रकारच्या बातम्या पेरल्या जातात. आमचे फारच जवळचे, विरोधक आणि आमचा फार विचार करणाऱ्यांनी या बातम्या पिकवल्या आहेत. देवेंद्र फडणवीस यांचे जवळचे मित्र असलेले मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अमोल काळे यांचे निधन झाल्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांसोबत फडणवीस हे नाशिक येथे काळे यांच्या अस्थी विसर्जनासाठी गेले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना गुरुवारीच मी आमचा उमेदवार अंतीम करून अर्ज भरायला जाईल, तेथे राष्ट्रवादीचेच नेते असतील, अशी कल्पना दिली होती. निवडणूक बिनविरोध होणार होती, म्हणून भाजप, शिवसेनेच्या नेत्यांना बोलाविण्यात आले नव्हते, म्हणून ते आले नाहीत, असेही पवार यांनी स्पष्ट केले.

### नेमकं काय म्हणाले अजित पवार?

“छगन भुजबळ नाराज आहेत, हे पूर्णपणे खोटं आहे. ते नाराज नाहीत, असं त्यांनी काल सांगितलं आहे. प्रफुल पटेल, सुनील तटकरे यांनी सांगितलं आहे की कोणीही नाराज नाही. मात्र, विरोधक आणि आमच्या जवळच्या मित्रांनी या बातम्या पेरल्या आहेत, असं अजित पवार म्हणाले. तसेच राज्यसभेसाठी एकमेव अर्ज दाखल झाला असून तो अर्जदेखील मंजूर झाला आहे. आता उमेदवाराने (सुनेत्रा पवार) माघार घेतली नाही. तर ते बिनविरोध खासदार होती”, अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली.

### नाराजीच्या चर्चांवर छगन भुजबळांची स्पष्टीकरण

दरम्यान, नाराजीच्या चर्चांवर छगन भुजबळ यांनीही स्पष्टीकरण दिलं होतं. सुनेत्रा पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला होता. यावेळी बोलताना, आपण उमेदवारीमुळे नाराज नसल्याचं भुजबळांनी यावेळी सांगितलं. होतं.

### ऑर्गनायझरमध्ये नेमकी काय टीका

*ऑर्गनायझर साप्ताहिकात संघाचे आजीव सदस्य रतन शारदा यांनी भाजपाच्या डोळ्यात अंजण घालणारा लेख लिहिला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या करिष्म्यामुळे हवेत गेलेल्या भाजपा कार्यकर्ते आणि नेत्यांसाठी लोकसभा निवडणुकीचा निकाल त्यांना वास्तवाची जाण करून देणारा ठरला आहे, असं त्यांनी या लेखात म्हटलं होते. याशिवाय लोकसभा निवडणुकीत भाजपाच्या पराभवाला नको असलेले राजकारण कारणीभूत असल्याची टीकाही या लेखातून करण्यात आली आहे. “महाराष्ट्रात काही गोष्टी टाळता आल्या असत्या. जसे की, भाजपा आणि शिवसेना शिंदे गटाचे बहुमत असतानाही राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला बरोबर घेतले गेले. यामुळे कित्येक वर्ष काँग्रेसी विचारधारेच्या विरोधात लढत असलेल्या भाजपाच्या समर्थकांना धक्का बसला. या एका कारणामुळे भाजपाने आपली किंमत कमी करून घेतली, असंही रतन शारदा यांनी म्हटलं होतं.*

“माझ्या तोंडावर नाराजी दिसतेय का? काय संबंध? मी अजिबात नाराज नाहीये. पक्षात सगळ्यांना सोबत घेऊन चर्चा करून निर्णय घ्यायचे असतात. हे मी ५७ वर्षांपासून शिकतोय.

# कांदा प्रश्नामुळे चार जिल्ह्यांत फटका!

## महायुतीला फटका बसल्याची कबुली : अजित पवार

।पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर कांदा प्रश्नाने डोके वर काढले होते. या प्रश्नी कांदा उत्पादक आणि ग्राहक या दोन्ही घटकांचे समाधान होईल, असा तोडगा काढावा, असे केंद्राला कळविले होते. मात्र, समाधानकारक तोडगा न निघाल्याने लोकसभा निवडणुकीत नाशिक, पुणे, नगर आणि सोलापूर या चार जिल्ह्यांत महायुतीला फटका बसल्याची कबुली राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी दिली.**




उपमुख्यमंत्री पवार पत्रकारांशी बोलताना म्हणाले, 'जळगाव, नाशिक, पुणे, नगर आणि सोलापूर जिल्ह्यातील अनेक शेतकरी कांदा उत्पादन घेतात. कांदा प्रश्न पेटल्यानंतर कांदा उत्पादकांमध्ये नाराजी होती. त्यामुळे कांदा उत्पादक आणि ग्राहक या दोन्ही घटकांचे समाधान होईल, असा तोडगा काढण्याबाबत केंद्राला आम्ही सांगितले होते. मात्र, तोडगा न निघाल्याने उत्तर महाराष्ट्रातील जळगाव आणि रावेर वगळता नाशिक, पुणे, नगर आणि सोलापूर येथील जागांवर महायुतीला फटका बसला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शपथविधीसाठी मी दिल्ली येथे गेलो होतो. तेव्हा अमित शहा आणि पियुष गोयल यांना देखील याची कल्पना देण्यात आली.'दरम्यान, लोकसभा निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर प्रत्येक जण आपापल्या पद्धतीने त्याचे विश्लेषण करत आहे. लोकशाहीत प्रत्येकाला आपापली मते मांडण्याचा अधिकार आहे. त्यामुळे यावर आता काही बोलणार नाही, अशा शब्दांत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबाबतच्या प्रश्नावर उपमुख्यमंत्री पवार यांनी अधिक बोलणे टाळले. राज्यसभा निवडणुकीत उमेदवारी देण्यावरून छगन भुजबळ नाराज असल्याचे धादांत खोटे आहे. यावर पक्षाचे वरिष्ठ नेते प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे आणि स्वत: भुजबळ यांनी नाराज नसल्याचे सांगितले आहे. तरीदेखील माध्यमांतून अशाप्रकारच्या बातम्या पेरल्या जातात. आमचे फारच जवळचे, विरोधक आणि आमचा फार विचार करणाऱ्यांनी या बातम्या पिकवल्या आहेत. देवेंद्र फडणवीस यांचे जवळचे मित्र असलेले मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अमोल काळे यांचे निधन झाल्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांसोबत फडणवीस हे नाशिक येथे काळे यांच्या अस्थी विसर्जनासाठी गेले होते.

### कांदा उत्पादकांमध्ये नाराजी

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना गुरुवारीच मी आमचा उमेदवार अंतीम करून अर्ज भरायला जाईल, तेथे राष्ट्रवादीचेच नेते असतील, अशी कल्पना दिली होती. निवडणूक बिनविरोध होणार होती, म्हणून भाजप, शिवसेनेच्या नेत्यांना बोलाविण्यात आले नव्हते, म्हणून ते आले नाहीत, असेही पवार यांनी स्पष्ट केले.उपमुख्यमंत्री पवार पत्रकारांशी बोलताना म्हणाले, 'जळगाव, नाशिक, पुणे, नगर आणि सोलापूर जिल्ह्यातील अनेक शेतकरी कांदा उत्पादन घेतात. कांदा प्रश्न पेटल्यानंतर कांदा उत्पादकांमध्ये नाराजी होती. त्यामुळे कांदा उत्पादक आणि ग्राहक या दोन्ही घटकांचे समाधान होईल, असा तोडगा काढण्याबाबत केंद्राला आम्ही सांगितले होते. मात्र, तोडगा न निघाल्याने उत्तर महाराष्ट्रातील जळगाव आणि रावेर वगळता नाशिक, पुणे, नगर आणि सोलापूर येथील जागांवर महायुतीला फटका बसला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शपथविधीसाठी मी दिल्ली येथे गेलो होतो. तेव्हा अमित शहा आणि पियुष गोयल यांना देखील याची कल्पना देण्यात आली.

# अगरवाल दाम्पत्यासह तिघांची कारागृहात रवानगी

## मकानदारला चौदा दिवस न्यायालयीन कोठडीत

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**कल्याणीनगर अपघात प्रकरणात अल्पवयीन मुलाचे बांधकाम व्यावसायिक वडील विशाल अगरवाल, त्याची आई शिवानी यांच्यासह एकाला अतिरिक्त सत्र न्यायाधीश यू. एम. मुधोळकर यांनी चौदा दिवस न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.**




कल्याणीनगर अपघात प्रकरणात अल्पवयीन मुलाच्या रक्ताचे नमुने बदलल्या प्रकरणी पोलिसांनी अगरवाल दाम्पत्यासह ससूनच्या न्यायवैद्यक शास्त्र विभागातील डॉ. अजय तावरे, डॉ. श्रीहरी हाळनोर, शिपाई अतुल घटकांबळे यांना अटक केली होती. तपासात बाल न्याय मंडळाच्या आवारात अगरवाल यांचा परिचित अश्फाक मकानदारने घटकांबळेला रक्त नमुने बदलण्यासाठी पैसे दिल्याचे उघड झाले. त्यानंतर मकानदारसह साथीदाराला अटक करण्यात आली.अगरवाल दाम्पत्यासह मकानदाराच्या पोलीस कोठडीची मुदत शुक्रवारी (१४ जून) संपली. त्यानंतर तिघांना न्यायालयात हजर करण्यात आले.

अल्पवयीन मुलाची वैद्यकीय तपासणी करण्यापूर्वी त्याच्या रक्ताचे नमुने बदलण्याबाबत अगरवाल दांपत्य आणि मकानदार यांच्यामध्ये एक बैठक झाली होती. बैठक कोठे झाली, तेथे कोण कोण उपस्थित होते, तसेच या बैठकीत अगरवाल दाम्पत्याने डॉ. अजय तावरे याच्याशी संपर्क साधला होता का?, याद्दष्टीने तपास करायचा आहे. तपासासाठी आरोपी मकानदार याला तीन दिवसांची पोलीस कोठडी द्यावी. अगरवाल दाम्पत्याला चौदा दिवस न्यायालयीन कोठडीत ठेवावे, अशी विनती तपास अधिकारी सहायक पोलीस आयुक्त सतीश गोवेकर यांनी न्यायालयाकडे केली. सरकारी वकील सुनील कुंभार यांनी बाजू मांडली.

अगरवाल दाम्पत्याच्या वतीने ॲड. प्रशांत पाटील, ॲड. हबीब मुलाणी, तसेच मकानदाराच्या वतीने ॲड. प्रसाद कुलकणी यांनी बाजू मांडली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद झाल्यानंतर न्यायालयाने अगरवाल दाम्पत्यासह मकानदारला चौदा दिवस न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. त्यानुसार न्यायालयाने तिघांची रवानगी येरवडा कारागृहात करण्याचे आदेश दिले.

### चौदा दिवस न्यायालयीन कोठडी

चौकशीत मकानदार ससून रुग्णालय, येरवडा पोलीस ठाणे, बाल न्याय मंडळाच्या आवारात उपस्थित असल्याचे निष्पन्न झाले. रक्ताचे नमुने बदलून पुरावा नष्ट करण्यासाठी मकानदाराने अगरवाल दाम्पत्याकडून चार लाख रुपये घेतले होते. त्यापैकी एक लाख रुपये त्याने कोणाला दिले, याबाबत तो माहिती तो देत नसल्याचे सहायक पोलीस आयुक्त सतीश गोवेकर यांनी न्यायालयात सांगितले. कल्याणीनगर अपघात प्रकरणात अल्पवयीन मुलाचे बांधकाम व्यावसायिक वडील विशाल अगरवाल, त्याची आई शिवानी यांच्यासह एकाला अतिरिक्त सत्र न्यायाधीश यू. एम. मुधोळकर यांनी चौदा दिवस न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

# डासोत्पत्ती ठिकाणांवर धाडी!

## नागरी आरोग्यासाठी महापालिका सतर्क : 156 अस्थापनांना नोटिसी

। पिंपरी चिंचवड ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महानगरपालिकेच्या आरोग्य व वैद्यकीय विभागाने शहरातील विविध ठिकाणी डास उत्पत्ती स्थानांची पाहणी करून डासांच्या अळ्या आढळलेल्या ठिकाणांच्या जागा मालकांवर आणि संबंधितांवर दंडात्मक कारवाई केली आहे. १ जून २०२४ पासून सुरू असलेल्या या कारवाईमध्ये १५६ आस्थापनांना नोटीस बजावण्यात आली आहे. तर आतापर्यंत एकूण १० हजार रुपये दंड वसूल करण्यात आला असल्याची माहिती आरोग्य व वैद्यकीय विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.**






किटकजन्य आजारांना आळा घालण्यासाठी शहरात विविध उपाययोजना करण्यात येत असून औद्योगिक, बांधकाम आस्थापना, कार्यालये, गृहसंस्था, घरे तसेच व्यावसायिक दुकानांसह सर्व आस्थापनांनी आपल्या ठिकाणी असलेली डास उत्पत्ती स्थळे तात्काळ नष्ट करावीत, अन्यथा कठोर कारवाई केली जाईल असा इशाराही देण्यात आला आहे.

डेंग्यू, चिकुणगुण्या, मलेरिया अशा किटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विविध भागांची तपासणी करून नोटीस बजावण्याची कारवाई महापालिकेने मोठ्या प्रमाणात सुरू केली आहे.शहरात डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिकेच्या तपासणी पथकातील कर्मचारी तपासणीसाठी आल्यास त्यांना नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहनही महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

### डासोत्पत्ती ठिकाणे आढळून आल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई

शहरात सुरू असलेल्या विविध बांधकाम आस्थापनांवर महापालिकेचे लक्ष आहे. पाणी साठणाऱ्या भागांची तपासणी करून संबंधितांना नोटीसा बजावण्यात येत आहेत. शिवाय अशी ठिकाणे आढळून आलेल्या आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.

> **महापालिकेच्या रुग्णालयांत तसेच दवाखान्यांमध्ये डेंगूच्या तपासणीकरिता आवश्यक असलेले रॅपिड किट उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. किटकजन्य रोग नियंत्रणासाठी स्वच्छ पाण्यात गप्पी मासे सोडणे, नागरिकांच्या घरांच्या कंटेनरचे सर्वेक्षण, व्यवसायाच्या ठिकाणांचे सर्वेक्षण केले जात आहे. पावसाळ्यात हिवताप, डेंग्यु, चिकुनगुन्यासारखे रोग पसरू नयेत यासाठी महापालिकेने खबरदारी घेतली आहे. शहरातील डेंग्यू, मलेरिया प्रतिबंधक मोहिमेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहे.**
>
> **-डॉ. लक्ष्मण गोफणे,**
> **आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

> **घराच्या आत आणि बाहेर स्वच्छ पाण्याने भरलेल्या कंटेनरमध्ये डासांची उत्पत्ती होत असते, शिवाय घरातील फ्लॉवर-पॉट, मनी प्लांट्स आणि फ्रीज ड्रिप पॅनमधील पाण्यात देखील अशी उत्पत्ती आढळून येते यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून नागरिकांनी या साधनांची नियमितपणे तपासणी करणे देखील आवश्यक आहे.**
>
> **-- यशवंत डांगे,**
> **सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

# रस्ते, पाणी अन् कचरा समस्या प्राधान्यक्रमाने सोडवा..!

## आमदार महेश लांडगे यांची सूचना; ई- क्षेत्रीय कार्यालयांतर्गत अधिकाऱ्यांची बैठक

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**रस्ते, पाणी आणि कचरा विषयक समस्यांमुळे सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो. तसेच, पावसाळ्यात यामुळे नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागते. त्यामुळे प्रशासनाने या समस्या प्राधान्याने सोडवाव्यात, अशी सूचना भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**



भोसरी विधानसभा मतदार संघातील ई- क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रलंबित समस्या आणि पावसाळा पूर्व कामांचा आढावा घेण्यासाठी बैठक घेण्यात आली. यावेळी सहायक आयुक्त राजेश आगळे यांच्यासह विविध विभागांचे सर्व अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मोशी गावठाण, गंधर्व नगरी, संत ज्ञानेश्वरनगर भाग, साई मंदिर परिसर, गोखलेमळा, अलंकापुरम सोसायटी, वडमुखवाडी, काळजेवाडी, ताजणेमळा, चोविसावाडी, च-होली, डुडूळगाव, दिघी, गजानन महाराज नगर, भारतमातानगर, गायकवाडनगर, भंडारी स्कायलाईन, समर्थनगर, कृष्णानगर, व्ही.एस.एन.एल. गणेशनगर, रामनगर, बोपखेल गावठाण. रामनगर, संत तुकारामनगर, गुरुदत्त कॉलनी, गंगोत्री पार्क, सावंतनगर, महादेवनगर, गवळीनगर, श्रीराम कॉलनी, संत ज्ञानेश्वरनगर, चक्रपाणी वसाहत भाग तसेच, शितलबाग, सेंच्युरी एन्का कॉलनी, सुविधा पार्क, आपटे कॉलनी, सँडविक कॉलनी, खंडोबा माळ, गव्हाणे वस्ती, भोसरी गावठाण, लांडेवाडी, शांतीनगर या भागातील समस्यांबाबत चर्चा करण्यात आली.

तापकीर वस्ती, चऱ्होली वडमुखवाडी येथील खड्डे दोन दिवसांत बुजवणे, मोशी येथील नवीन देहू आळंदी रस्त्यावर चौधरी ढाब्यासमोर ड्रेनेज लाईनमधील चेंबर दुरूस्त करणे. जय गणेश लॉन्सच्या समोरील रस्ता, वाय जंक्शन मोशी-डुडुळगाव येथील रस्ता प्रशस्त करणे. डुडूळगाव येथील सचिन पवार यांच्या शेतातील जलनिस्सारणाची लाईन दुरूस्त करणे. रवितेज सोसायटी, सस्ते तालीम, राधाकृष्ण नगर मोशी येथील ड्रेनेज साफसफाई करणे. काळी भिंत येथील ड्रेनेज साफसफाई करणे. गंधर्व नगरी आणि फातिमानगर येथील ड्रेनेज वारंवार चोकअप काढणे. भोसले वस्ती नाला आणि सरपंच वस्तीनाला सफाई करून घेणे. पांडुरंग हॉटेल जवळचा नाला सफाई करून घ्यावी, अशा सूचना आ. लांडगे यांनी केल्या आहेत.

### गवळीनगरमधील समस्या सुटणार!

प्रभाग क्रमांक ५ गवळीनगर येथील गंगोत्री पार्क रोड खड्डे बुजवणे, मंगलमूर्ती मेडिकल ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे, स्वामी समर्थ नगर येथील नाल्याची स्वच्छता करणे, महादेव नगर येथील ड्रेनेज लाईन साफसफाई करून घेणे, संत ज्ञानेश्वर हायस्कूल आळंदी रोड भोसरी येथील ड्रेनेज सफाई, दिघी रोड येथे स्वच्छतागृहाची सफाई करून घेणे. महाराष्ट्र चौक दुर्गा माती कॉलनी ड्रेनेज सफाई, सँडविच कॉलनी दिघी रोड येथे दुथर्व असलेल्या झाडांची छाटणी करणे. तसेच, प्रभाग क्रमांक ७ मधील जनाईड्स हाइट्स पावसाळी पाणी समस्या, आळंदी रोड आणि दिघी रोड खड्डे बुजवण्याबाबत आमदार महेश लांडगे यांनी प्रशासनाला सूचना केल्या आहेत.



भूमिका

# सत्ता होती तिथे हार..!



**'सरकार आता कामालाही लागले, तरीही भाजप हरल्याची चर्चा कशाला?' या प्रश्नाचे साधे उत्तर – 'देशाची राजकीय सद्या:स्थिती नेमकी समजून घेण्यासाठी' हेच असू शकते. त्या स्थितीचा अंदाज कुणाला सहजासहजी येणे कठीण, हे तर '५० टक्के मते घेऊन ४०० पार' यांसारख्या घोषणांतूनही दिसले आहे.**

पैसा, 'मीडिया', सरकारी यंत्रणा आणि अगदी निवडणूक आयोगसुद्धा – या साऱ्यां चे बळ असूनही २४० जागा कशा, याची चर्चा कोणत्याही अभिनिवेशाविना केल्यास निराळे चित्र उभे राहते. हे चित्र राज्याराज्यांतील लोकसभा निकालांतून स्पष्ट होते आहे- त्यातून, 'सत्ताधारी भाजप' आणि 'जिथे सत्ता नाही, अशा राज्यांतील भाजप' अशा दोन भिन्न प्रकारच्या कामगिऱ्या यंदा दिसत आहेत.भाजप हा पक्ष एकच, पण जणू दोन पक्ष असावेत इतका फरक या कामगिऱ्यांमध्ये दिसतो. ज्या राज्यांत भाजपची सत्ता नव्हती तिथे लोकसभेसाठी भाजपच्या प्रचाराला चांगला प्रतिसाद मतदारांनी दिला, पण जिथे भाजपची सत्ता होती तिथे प्रस्थापितविरोधी मताचा फटका बसला असेच आहे का हे? आपण आकडे पाहू. लोकसभेच्या एकंदर जागा ५४३, त्यापैकी ३५६ मतदारसंघ यंदा असे होते की, जिथून लोकसभेत भाजपचा खासदार आहे किंवा ज्या लोकसभा मतदारसंघांतील विधानसभा क्षेत्रे तरी भाजपकडे आहेत. ही संख्या ५४३ च्या तुलनेत दोनतृतीयांश भरते. महाराष्ट्र, बिहार, झारखंड तसेच कर्नाटक वा हिमाचल प्रदेशसारखी- जेथे मुख्यमंत्री भाजपचे नाहीत अशी राज्येही यात समाविष्ट आहेत. या प्रदेशांतील २७१ लोकसभा जागांपैकी ७५ यंदा भाजपला राखता आलेल्या नाहीत. कर्नाटक असो की बिहार, सरासरी पाच टक्के मते भाजपच्या विरुद्ध जाण्याचा नकारात्मक कल (झुकाव) यंदा दिसून आला. पण उरलेल्या १८७ जागांवर- जिथे भाजपची सत्ता वा सद्दी नव्हती आणि जिथे भाजप हाच लोकसभेसाठी प्रमुख आव्हानदायी पक्ष (ओडिशात बिजू जनता दलाशी, आंध्र प्रदेशात वायएसआर काँग्रेसशी, तर पश्चिम बंगालात तृणमूल काँग्रेसशी सामना) होता, अशा राज्यांमध्ये भाजपने गेल्या वेळच्या जागा राखून १२ अधिक जागा कमावल्या. या भागात भाजपच्या बाजूने सहा टक्के मतांचा सकारात्मक कल दिसला, हेही विशेष. यामुळेच देशभरातील भाजपच्या एकंदर मतांच्या प्रमाणात फक्त एखाद्याच टक्क्याची घट झाल्याचे दिसले. २०१९ मध्ये भाजपने लढवलेल्या जागांवर मिळवलेल्या मतांशी २०२४ मध्ये लढवलेल्या मतदारसंघांतील मतांचे प्रमाण ताडून पाहिले तर पीछेहाट लक्षात येते. यावेळी ३९९ पैकी २७४ जागांवर भाजपच्या मतांची टक्केवारी कमी झाली. यात महाराष्ट्र, राजस्थान, बिहार, झारखंड, हरियाणा, हिमाचल प्रदेश, पंजाब व जम्मूमध्ये लढवलेल्या सर्व जागांचा समावेश आहे. काश्मीर आणि उत्तर प्रदेशातील दोन वगळता सर्व जागा समाविष्ट आहेत.भाजपच्या उमेदवारांचे मताधिक्यही घटले. २० टक्के किंवा त्याहून अधिक मताधिक्याने जिंकलेल्या जागांची संख्या १५१ वरून फक्त ७७ झाली. गेल्या वेळी आणि यंदाही २१५ जागांवर काँग्रेस आणि भाजप अशी थेट लढत होती. यापैकी ९० टक्के जागांवर भाजपने, सरासरी २१ टक्क्यांच्या मताधिक्याने विजय मिळवला होता. यंदा मात्र भाजपने यापैकी १५३ जागा टिकवल्या आणि ६२ काँग्रेसला मिळाल्या. भाजपने जिंकलेल्या या जागांवरील मताधिक्याची सरासरी यंदा १० टक्क्यांहून थोडी कमीच आली. २०१९ च्या तुलनेत या २१५ जागांवर, भाजपविरुद्ध (नकारात्मक) ५.५ टक्के कल दिसला. हे नुकसान गंभीर ठरले. राज्याराज्यांमध्ये भाजपने लढवलेल्या जागांवरील मताधिक्याचे आकडे आता पाहू. राजस्थान (उणे ११.५ टक्के), हरियाणा (उणे ११.९ टक्के) आणि हिमाचल (उणे १२.७ टक्के) या राज्यांमध्ये भाजपविरोधी नकारात्मक कल सर्वाधिक होता. या राज्यांमध्ये भाजपची पूर्वीची आघाडी मोठी होती, परंतु राजस्थान आणि हरियाणापुरते पाहिल्यास असे दिसते की, तेव्हाचा कल काही भागांपुरता केंद्रित होता, कारण भाजपने मोठ्या प्रमाणात जागा गमावल्या होत्या. उत्तर प्रदेशात भाजपने किती जागा गमावल्या याची चर्चा सर्वतोमुखी असताना, घटलेल्या मत-प्रमाणातून मतदारांचा कल आणखी निराळे चित्र दाखवतो आणि ते केवळ या एका राज्याबद्दलचे नाही. उत्तर प्रदेश (उणे ६.८ टक्के), बिहार (उणे ६.९ टक्के) आणि झारखंड (७ टक्के) या शेजारील राज्यांमध्ये भाजपविरोधातील कल जवळपास सारखाच आहे.

## प्रासंगिक »

### दहशत आणि दानत!

***काश्मीरच्या लोकशाही प्रक्रियेत बाधा आणण्याचे प्रयत्न सीमेपलीकडूनही होतच राहणार; त्यामुळे लागोपाठच्या हल्ल्यांनंतर काँग्रेसची टीका तूर्तास अनाठायी ठरते...***

जम्मू-काश्मीरमध्ये अनेक ठिकाणी गेल्या महिन्यात विक्रमी मतदान झाल्याच्या बातम्या आल्यानंतर काही दिवसांतच तेथे दहशतवादी हल्ले सुरू होणे हा निव्वळ योगायोग असूच शकत नाही. यंदा दिल्लीत केंद्रीय मंत्रिमंडळाचा शपथविधी सुरू असण्याच्या सुमारास जम्मू विभागातील रिआसी जिल्ह्यात यात्रेकरूंच्या बसवर झालेल्या हल्ल्यात नऊ जणांचा मृत्यू झाला. हादेखील योगायोग नाही. जम्मू-काश्मीरमध्ये लवकरच विधानसभा निवडणुका होतील. त्या होऊ नयेत यासाठी पाकिस्तानातील जिहादी गट आयएसआयच्या आशीर्वादाने आणखीही हल्ले करण्याची शक्यता नाकारता येत नाही. गेल्या चार दिवसांत काश्मीर खोऱ्यात नव्हे, तर जम्मू विभागात चार हल्ले झाले आहेत. त्यात नागरिकांबरोबरच एका निमलष्करी जवानाचाही मृत्यू झाला आहे.

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशात समाजवादी पक्षाने उत्तम कामगिरी केली आहे. परंतु बहुजन समाज पक्षाने त्याच्या इतिहासात कधी नव्हे, एवढी सुमार कामगिरी केली आहे. मायावती यांनी स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून घेतली आहे. त्यांच्या आत्मघाती निर्णयामुळे पक्षाचे अस्तित्व पणाला लागले आहे.

# आत्मघाती निर्णयामुळे पक्षाचे अस्तित्व पणाला

देशाने दिलेल्या जनादेशात उत्तर प्रदेशची सर्वाधिक चर्चा होत आहे. तिथे अखिलेश यांनी आश्चर्यकारक कामगिरी केली आहे आणि वडील मुलायमसिंह यादव यांच्यापेक्षाही मोठा विजय मिळवला आहे. त्याचवेळी बसप आणि भगिनी मायावती यांचीही चर्चा होत आहे. बसपने देशात दुसऱ्या क्रमांकाच्या ४२५ जागा लढवूनही एकही जागा या पक्षाला मिळाली नाही. उत्तर प्रदेशात तर या पक्षाचा मतांचा आलेख थेट निम्म्यावर आला आहे. १९ टक्क्यांवरून मतांची टक्केवारी नऊ टक्क्यांवर आली आहे. गेल्यावेळी उत्तर प्रदेशात लोकसभेच्या दहा जागा मिळाल्या होत्या. समाजवादी पक्षाबरोबर युती करून मायावती यांना फायदा झाला होता. एकेकाळी 'सोशल इंजिनिअरींग' करून उत्तर प्रदेशची सत्ता मिळवलेल्या मायावती त्यांच्या काळातील कथित गैरव्यवहारामुळे इतक्या अडचणीत आल्या, की त्यांनी भाजपला पूरक भूमिका घेतल्याने त्यांना त्यांचा आणि पक्षाचा आत्मघात करून घ्यावा लागला. मायावती यांचा



पक्ष दलितांचा पक्ष म्हणून उदयाला आला होता. आता मात्र त्याच दलितांनी मायावती यांची साथ सोडली. मायावती यांच्या पक्षाकडील मतपेढी त्यांच्याच आत्मघातकी निर्णयामुळे समाजवादी पक्ष आणि काँग्रेसकडे सरकली. उत्तर प्रदेशातील दलितांच्या राजकारणात मायावती या मसिहा होत्या. त्यांच्या निर्णयामुळे आता दलित त्यांना नेता मानायला तयार नाहीत. उत्तर प्रदेशात आता दलितांच्या राजकारणात एक पोकळी तयार झाली आहे. त्यांचे राजकीय अवकाश आता चंद्रशेखर यांना मिळायला लागले आहे. स्वतःच्या चुकीमुळे मायावती यांनी आपले राजकीय अवकाश इतरांना उपलब्ध करून दिले आहे. संसदीय व्यवस्थेत बसप शून्यावर येण्याची ही पहिलीच वेळ आहे. उत्तर प्रदेश विधानसभेत त्यांचे एकमेव आमदार उमाशंकर सिंह आहेत. सिंह हे ही बसपमुळे नव्हे, तर स्वबळावर जिंकतात. सुरुवातीपासूनच बहनजींचे संपूर्ण राजकारण काही वर्षे दबावाखाली सुरू असल्याचे दिसून आले. गेल्या वेळी उत्तर प्रदेशातील विधानसभा निवडणुकीच्या वेळी त्या कोणत्या ना कोणत्या राजकीय किंवा अन्य प्रकारच्या दबावाखाली असल्याचे दिसून आले होते. भाजपच्या हातातल्या कळसुत्री बाहुल्याप्रमाणे त्या राजकीय गेम खेळतात. त्याचा फायदा शेवटी भाजपला होत असल्याचा निष्कर्षही काढण्यात आला. लोकसभा निवडणुकीच्या वेळी 'इंडिया'आघाडीच्या लोकांनी पुढे येऊन तिची समजूत काढण्याचा प्रयत्न केला; मात्र मायावतींनी एकट्याने लढण्याचा निर्णय घेतला. लोकसभा निवडणुकीच्या वेळी जेव्हा त्यांनी तिकिट वाटप सुरू केले, तेव्हा त्या दडपणातून बाहेर पडत असल्याचे दिसत होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे '**महाईन्यूज**'च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राज ठाकरेंनी शिवसेना सोडून चूक केली!

## माझे आणि बाळासाहेबांचे तर मतभेद झाले : छगन

। मुंबई । महाईन्यूज
। प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणूक झाल्यापासून आणि खासकरुन महाराष्ट्रातले निकाल समोर आल्यापासून छगन भुजबळ यांचं नाव चांगलंच चर्चेत आलं आहे. छगन भुजबळ यांनी गेल्या काही दिवसांत जी विधानं केली आहेत त्यावरुन ते नाराज झाले आहेत का? या चर्चा रंगत आहेत. अशात छगन भुजबळ आणि उद्धव ठाकरे यांच्यावर राज ठाकरेंनी टीका केली होती. बाळासाहेब ठाकरेंना ज्या माणसाने अटक केली त्यांच्या मांडीला मांडी लावून उद्धव ठाकरे बसले असं राज ठाकरे भाषणात म्हणाले होते. त्याबाबत प्रश्न विचारला असता राज ठाकरेंना छगन भुजबळांनी महत्त्वाचा सवाल केला आहे.**



मी विरोधी पक्षनेता होतो तेव्हा बाळासाहेब ठाकरे यांच्यावर टीका केली.बाळासाहेबांनी माझ्यावर टीका केली. माझ्यासमोर जी फाईल आली ती फाईल होम डिपार्टमेंट म्हणून माझ्याकडे आली. त्याआधी अगोदर शिवाजी पार्कवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाली त्यावेळेला आम्ही सांगितलं होतं की, श्रीकृष्ण कमिटीचा जो अहवाल आहे त्याची आम्ही अंमलबजावणी करु. त्यानंतर मी कारवाई केली होती. माझ्यापुढे तेव्हा मार्गच नव्हता.” असं छगन भुजबळ म्हणाले तसंच राज ठाकरे आणि बाळासाहेब ठाकरेंचा उल्लेखही त्यांनी केला.मी राज ठाकरेंना विचारु इच्छितो की राज ठाकरे लहान होते तेव्हा शाळेतून आले नाहीत की बाळासाहेब विचारायचे राजा अजून कसा आला नाही? माँ विचारायच्या राजा का आला नाही? राज ठाकरे घरी आल्याशिवाय माँ आणि बाळासाहेब हे दोघंही जेवत नव्हते. रक्ताचं नातं आहे. माझे आणि बाळासाहेबांचे तर मतभेद झाले. मंडल आयोग किंवा इतर कशावरुन. पण राज ठाकरेंचं काय? तुमचे मतभेद कशावरुन झाले? मतभेद झाले तरीही तुम्ही हे लक्षात घ्यायचं होतं की शिवसेना बाळासाहेब ठाकरेंची आहे. मग तुम्ही वेगळं व्हायचं कारण काय? तुमची काय मागणी होती सांगा लोकांना. मतभेद होते तरीही सांभाळून घ्यायला नकोत? बाळासाहेबांना किती दुःख झालं असेल की ज्याला मी लहानपणापासून सांभाळत होतो त्याने असं करावं हे त्यांना वाटलंच असेल.” असं भुजबळ म्हणाले. टीव्ही ९ मराठीला दिलेल्या मुलाखतीत भुजबळ यांनी हे भाष्य केलं.यापुढे भुजबळ म्हणाले, “राज ठाकरेंनी मनसे पक्ष काढला तो पुढचा भाग. शिवसेना सोडून त्यांनी चूक केली. एकमेकांवर टीका झाली. शिवसेना आणि राज ठाकरेंवर किती टीका टिपण्णी झाली. बाळासाहेब ठाकरेंनी त्यांना सांगितलं असतं की हे नाही तर ते काम कर. त्यांनी (राज ठाकरे) ऐकायचं होतं.“ राज ठाकरे यांनी शिवसेना सोडली तेव्हा मी दोघांनाही फोन केला आणि बोललो की पाच ते सहा दिवस एकमेकांविरोधात काहीही बोलू नका. राग हा त्या क्षणापुरता असतो, राग शांत झाला की मन बदलतं. दोघांनीही ऐकलं पण मतभेद झाले आणि राज ठाकरेंनी त्यांचा निर्णय घेतल्याचं भुजबळ यांनी सागितलं. मी विरोधी पक्षनेता होतो तेव्हा बाळासाहेब ठाकरे यांच्यावर टीका केली. बाळासाहेबांनी माझ्यावर टीका केली. माझ्यासमोर जी फाईल आली ती फाईल होम डिपार्टमेंट म्हणून माझ्याकडे आली. त्याआधी अगोदर शिवाजी पार्कवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाली त्यावेळेला आम्ही सांगितलं होतं की, श्रीकृष्ण कमिटीचा जो अहवाल आहे त्याची आम्ही अंमलबजावणी करु. त्यानंतर मी कारवाई केली होती. माझ्यापुढे तेव्हा मार्गच नव्हता. ” असं छगन भुजबळ म्हणाले तसंच राज ठाकरे आणि बाळासाहेब ठाकरेंचा उल्लेखही त्यांनी केला.मी राज ठाकरेंना विचारु इच्छितो की राज ठाकरे लहान होते तेव्हा शाळेतून आले नाहीत की बाळासाहेब विचारायचे राजा अजून कसा आला नाही?

### राग शांत झाला की मन बदलतं

माँ विचारायच्या राजा का आला नाही? राज ठाकरे घरी आल्याशिवाय माँ आणि बाळासाहेब हे दोघंही जेवत नव्हते. रक्ताचं नातं आहे. माझे आणि बाळासाहेबांचे तर मतभेद झाले. मंडल आयोग किंवा इतर कशावरुन. पण राज ठाकरेंचं काय? तुमचे मतभेद कशावरुन झाले? मतभेद झाले तरीही तुम्ही हे लक्षात घ्यायचं होतं की शिवसेना बाळासाहेब ठाकरेंची आहे. मग तुम्ही वेगळं व्हायचं कारण काय? तुमची काय मागणी होती सांगा लोकांना. मतभेद होते तरीही सांभाळून घ्यायला नकोत? बाळासाहेबांना किती दुःख झालं असेल की ज्याला मी लहानपणापासून सांभाळत होतो त्याने असं करावं हे त्यांना वाटलंच असेल.” असं भुजबळ म्हणाले. टीव्ही ९ मराठीला दिलेल्या मुलाखतीत भुजबळ यांनी हे भाष्य केलं.यापुढे भुजबळ म्हणाले, “राज ठाकरेंनी मनसे पक्ष काढला तो पुढचा भाग. शिवसेना सोडून त्यांनी चूक केली. एकमेकांवर टीका झाली. शिवसेना आणि राज ठाकरेंवर किती टीका टिपण्णी झाली. बाळासाहेब ठाकरेंनी त्यांना सांगितलं असतं की हे नाही तर ते काम कर. त्यांनी (राज ठाकरे) ऐकायचं होतं.“ राज ठाकरे यांनी शिवसेना सोडली तेव्हा मी दोघांनाही फोन केला आणि बोललो की पाच ते सहा दिवस एकमेकांविरोधात काहीही बोलू नका. राग हा त्या क्षणापुरता असतो, राग शांत झाला की मन बदलतं.

# उजनी पर्यटन विकास केंद्र उभारण्याच्या पुन्हा हालचाली

## अजित पवारांच्या उपस्थितीत पुण्यातील बैठकीत आराखडा सादर

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सोलापूर आणि पुणे जिल्ह्याच्या सीमेवर उजनी धरणाच्या पायथ्याला पर्यटन केंद्र उभारण्यासह सोलापूर जिल्ह्यात एकात्मिक पर्यटन विकास आराखड्यासाठी पुण्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत बैठक झाली.**

यावेळी सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी उजनी पर्यटन विकास आराखडा सादर केला. याबाबतचा सविस्तर प्रस्ताव दाखल केल्यास सुरुवातीला शंभर कोटींचा निधी राज्य विधिमंडळाच्या आगामी पावसाळी अधिवेशनात उपलब्ध करून देण्याची ग्वाही पवार यांनी या बैठकीत दिली. पुण्यात विधान भवनात झालेल्या बैठकीत सोलापूर जिल्ह्यातील एकात्मिक पर्यटन विकासावर चर्चा झाली. उजनी पर्यटन केंद्र उभारणीसाठी तत्कालीन जिल्हाधिकारी मिलिंद



शंभरकर यांनी पुढाकार घेऊन चालना दिली होती. महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाने उजनी धरणालगतची सहा हेक्टर जमीन जलसंपदा विभागाकडे मागितली होती. मात्र जमिनीच्या मोबदल्याचा मुद्दा प्रलंबित आहे. उजनी धरणाच्या परिसरात कृष्णा खोरे विकास महामंडळाची जमीन आहे. धरणाची उभारणी होऊन ४२ वर्षांचा कालावधी लोटला आहे. धरणाच्या मूळ आराखड्यात धरणाच्या पायथ्यास उजव्या तीरावर ४३.२६ हेक्टर जमीन पैठणचे संत ज्ञानेश्वर उद्यान आणि म्हैसूरच्या वृंदावन उद्यानाच्या धर्तीवर उद्यान विकसित करण्यासाठी आरक्षित आहे. परंतु या जागेवरही मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाली आहेत. अतिक्रमणे केलेल्या स्थानिकांकडून या उजनी पर्यटन केंद्राच्या उभारणीला विरोध आहे. या पार्श्वभूमीवर अतिक्रमणमुक्त सहा हेक्टर जमीन एमटीडीसीने यापूर्वीच मागितली आहे.

### धरणावर अन्य देशांतून पक्षी येतात

उजनी धरणाकडे स्थलांतरित पक्ष्यांचे नंदनवन म्हणून पाहिले जाते. धरणावर दरवर्षी युरोपसह अन्य देशांतून पक्षी येतात. हिवाळ्यात रशियाजवळच्या युरेशिया, सायबेरिया, मंगोलिया आदी देशांतून पट्टकदंब हंस, चक्रवाक बदक, पाणटिवळे, धोबी यांसह अनेक पक्षी हिमालयाची हिमशिखरे ओलांडून भारतीय उपखंडात येऊन दाखल होत असतात.पुढे तीन-चार महिने विविध राज्यांतील जलस्थानांवर वास्तव्य करून पुन्हा आपल्या मूळ प्रदेशांकडे हे पक्षी निघून जातात.

# मेलोनींनी मोदींना केलेलं 'नमस्ते' चर्चेत!

## पंतप्रधान नरेंद्र मोदी जी-7 परिषदेसाठी इटलीला पोहचले

।नवी दिल्ली।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**



**इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनी गुरुवारी जगभरातून आलेल्या नेत्यांचं स्वागत 'नमस्ते' करत केलं. विशेष बाब म्हणजे तिसऱ्यांदा भारताचे पंतप्रधान झालेले नरेंद्र मोदी यांचं स्वागतही त्यांनी नमस्ते करतच केलं. मोदींनीही त्यांना नमस्कार केला. या दोघांच्या 'नमस्ते'चा फोटो सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होतो आहे. तसंच नेटकऱ्यांनी या दोन्ही नेत्यांचं, खास करुन जॉर्जिया मेलोनींचं स्वागत केलं आहे.**

इटलीत भारताची संस्कृती दिसली, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी भारतीय संस्कृती साता समुद्रापार पोहचवली आहे. असं कुमार नावाच्या एका युजरने म्हटलंय. देख रहा है ना बिनोद मोदीजी को नमस्ते किया. अशी एक कमेंट मुकुल नावाच्या युजरने केली आहे. जगभरात नमस्ते चर्चेत आलंय ते फक्त मोदींमुळेच असंही एका नेटकऱ्याने म्हटलं आहे. जॉर्जिया मेलोनी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा व्हिडीओ आणि फोटो अनेक नेटकरी व्हायरल करत आहेत.पंतप्रधान नरेंद्र मोदी जी ७ परिषदेसाठी गुरुवारी रात्री इटलीला पोहचले. त्यांनी नुकतीच देशाचे पंतप्रधान म्हणून तिसऱ्यांदा शपथ घेतली. इटलीत पोहचल्यानंतर त्यांनी जॉर्जिया मेलोनी यांची भेट घेतली. त्यावेळी हस्तांदोलन करण्याऐवजी मेलोनी यांनी नमस्ते करत पंतप्रधान नरेंद्र मोदींचं स्वागत केलं. नरेंद्र मोदी यांच्याप्रमाणेच इतर नेत्यांनाही त्यांनी नमस्ते केलं. ज्याचं कौतुक सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात होताना दिसतं आहे. हस्तांदोलन करणं ही पाश्चात्य पद्धत आहे. तर नमस्कार, नमस्ते अशा पद्धतीने स्वागत करणं ही भारतीय पद्धत आहे. जॉर्जिया मेलोनी यांनी अशा भारतीय पद्धतीने स्वागत केल्याने त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होतो आहे.जी ७ शिखर परिषदेत रशिया आणि युक्रेन युद्धावर चर्चा होण्याची शक्यता आहे. याबरोबरच इतर जागतिक विषयांवरील मुद्दांवर चर्चा होण्याची शक्यता आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबरोबर या दौऱ्यावेळी एक उच्चस्तरीय शिष्टमंडळही असण्याची शक्यता आहे. यामध्ये परराष्ट्र मंत्री एस जयशंकर, परराष्ट्र सचिव विनय क्वात्रा यांचा समावेश असेल. या दौऱ्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांच्यासह अनेक देशाच्या प्रमुखांबरोबर महत्वाच्या विषयांवर चर्चा करण्याची शक्यता आहे.एकीकडे इटलीत जी-७ परिषदेची लगबग चालू आहे, तर दुसऱ्या बाजूला इटलीच्या संसदेत मोठा गोंधळ पाहायला मिळत आहे. इटलीच्या संसदेत काही खासदारांनी एकमेकांना धक्काबुक्की केल्याचा प्रकार पहायला मिळाला. या घटनेचा व्हिडीओही सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होतोय. जी-७ शिखर परिषदेनिमित्त जगभरातील मोठ्या देशांचे प्रमुख इटलीत झाले आहेत. अशावेळी हा व्हिडीओ व्हायरल झाल्याने वेगवेगळ्या चर्चांना उधाण आलं आहे.इटलीत भारताची संस्कृती दिसली, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी भारतीय संस्कृती साता समुद्रापार पोहचवली आहे. असं कुमार नावाच्या एका युजरने म्हटलंय. देख रहा है ना बिनोद मोदीजी को नमस्ते किया. अशी एक कमेंट मुकुल नावाच्या युजरने केली आहे. जगभरात नमस्ते चर्चेत आलंय ते फक्त मोदींमुळेच असंही एका नेटकऱ्याने म्हटलं आहे. जॉर्जिया मेलोनी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा व्हिडीओ आणि फोटो अनेक नेटकरी व्हायरल करत आहेत.पंतप्रधान नरेंद्र मोदी जी ७ परिषदेसाठी गुरुवारी रात्री इटलीला पोहचले.

### इटलीच्या संसदेत काहीसा गोंधळ

त्यांनी नुकतीच देशाचे पंतप्रधान म्हणून तिसऱ्यांदा शपथ घेतली. इटलीत पोहचल्यानंतर त्यांनी जॉर्जिया मेलोनी यांची भेट घेतली. त्यावेळी हस्तांदोलन करण्याऐवजी मेलोनी यांनी नमस्ते करत पंतप्रधान नरेंद्र मोदींचं स्वागत केलं. नरेंद्र मोदी यांच्याप्रमाणेच इतर नेत्यांनाही त्यांनी नमस्ते केलं. ज्याचं कौतुक सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात होताना दिसतं आहे. हस्तांदोलन करणं ही पाश्चात्य पद्धत आहे. तर नमस्कार, नमस्ते अशा पद्धतीने स्वागत करणं ही भारतीय पद्धत आहे. जॉर्जिया मेलोनी यांनी अशा भारतीय पद्धतीने स्वागत केल्याने त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होतो आहे.जी ७ शिखर परिषदेत रशिया आणि युक्रेन युद्धावर चर्चा होण्याची शक्यता आहे. याबरोबरच इतर जागतिक विषयांवरील मुद्दांवर चर्चा होण्याची शक्यता आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबरोबर या दौऱ्यावेळी एक उच्चस्तरीय शिष्टमंडळही असण्याची शक्यता आहे. यामध्ये परराष्ट्र मंत्री एस जयशंकर, परराष्ट्र सचिव विनय क्वात्रा यांचा समावेश असेसऱ्या बाजूला इटलीच्या संसदेत मोठा गोंधळ पाहायला मिळत आहे. इटलीच्या संसदेत काही खासदारांनी एकमेकांना धक्काबुक्की केल्याचा प्रकार पहायला मिळाला. या घटनेचा व्हिडीओही सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होतोय. जी-७ शिखर परिषदेनिमित्त जगभरातील मोठ्या देशांचे प्रमुख इटलीत झाले आहेत.

# योगी सरसंघचालक मोहन भागवतांची भेट घेणार

## गोरखपूरमध्ये 3 जुलैपासून प्रशिक्षण वर्ग सुरु; 280 स्वयंसेवक सहभागी होणार

।नवी दिल्ली।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**लोकसभा निवडणूक निकालांनंतर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ सरसंघचालक मोहन भागवत यांची भेट घेणार आहे. ही भेट गोरखपूरमध्ये होणार आहे. २०१४ मध्ये भाजपाने २८२ जागा जिंकल्या होत्या, तर २०१९ मध्ये ३०३ झाली होती. मात्र २०२४ च्या लोकसभा निवडणुकींत भाजपाचे २४० खासदारच निवडून आले. महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश या दोन राज्यांमध्ये सर्वात मोठा फटका भाजपाला बसला.**



या संबंधी दोघांमध्ये चर्चा आणि वैचारिक मंथन होण्याची चिन्ह दिसत आहेत.योगी आदित्यनाथ आणि सरसंघचालक मोहन भागवत यांच्या भेटी दरम्यान निवडणूक निकालांमध्ये काय घडलं ? पुढची रणनीती कशी असेल? या सगळ्या बाबत बातचीत होऊ शकते. गोरखपूरमध्ये ३ जुलैपासून प्रशिक्षण वर्ग सुरु होणार आहे. २८० स्वयंसेवक यामध्ये सहभागी होणार आहेत. निवडणूक निकाल लागल्यानंतर मोहन भागवत यांनी चिमटे काढत, मणिपूरचा प्रश्न निकाला लावा सांगत महत्त्वाचे सल्ले दिले आहेत. दुसरीकडे गोरखपूरच्या प्रशिक्षण वर्गात मोहन भागवत काय बोलणार हे पाहणंही महत्त्वाचं असणार आहे. संघ विस्तार कसा होईल? राजकीय घटना काय काय? या सगळ्यांबाबतही मंथन होईल अशी चिन्हं आहेत. त्यामुळे आता या भेटीदरम्यान काय होतं ते पाहणं महत्त्वाचं असणार आहे. इंडिया टुडेने हे वृत्त दिलं आहे.मिळालेल्या माहितीनुसार सरसंघचालकांनी शाखांची संख्या वाढवण्यावर आणि विस्तारवादावर जोर दिला आहे. संघाचं काम काय ते लोकांपर्यंत पोहचवण्यासही सांगण्यात आलं आहे. लोकसभेत भाजपा आणि एनडीएने ४०० पारचा नारा दिला होता. त्यापैकी ३७० जागा आपण आपल्या बळावर जिंकू असंही भाजपाने म्हटलं होतं. प्रत्यक्षात भाजपाला २५० ही संख्याही स्वबळावर गाठता आलेली नाही. या सगळ्या दिवसानंतर सरसंघचालक आणि संघाच्या इतर नेत्यांची वक्तव्य समोर येत आहेत. सातत्याने भाजपाला पराभवावरुन ऐकवलं जातं आहे.आरएसएसचे नेते इंद्रेश कुमार यांनी लोकसभा निवडणूक निकालानंतर एक लेख लिहून भाजपाला अहंकारी म्हटलं आहे. तर इंडिया आघाडीला राम विरोधी म्हटलं आहे. ज्यांनी रामाची भक्ती केली.

### शाखांची संख्या वाढवली जाणार?

त्यांच्यात हळूहळू अहंकार आला. तरीही लोकांनी सर्वात मोठा पक्ष म्हणून त्यांना निवडलं. तर ज्यांनी रामाला विरोध केला ते रामविरोधी आहेत.असंही त्यांनी म्हटलं होतं. या सगळ्या पार्श्वभूमीवर सरसंघचालक मोहन भागवत आणि योगी आदित्यनाथ यांची भेट महत्त्वाची मानली जाते आहे.प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ सरसंघचालक मोहन भागवत यांची भेट घेणार आहे. ही भेट गोरखपूरमध्ये होणार आहे. २०१४ मध्ये भाजपाने २८२ जागा जिंकल्या होत्या, तर २०१९ मध्ये ३०३ झाली होती. मात्र २०२४ च्या लोकसभा निवडणुकींत भाजपाचे २४० खासदारच निवडून आले.

## सोनाक्षीच्या लग्नावर पूनम ढिल्लोंचा शिक्कामोर्तब

अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा लवकरच लग्नबंधनात अडकणार आहे. सोनाक्षी व तिचा बॉयफ्रेंड झहीर इक्बाल दोघेही २३ जून रोजी लग्न करणार आहेत. मुंबईत त्यांचा विवाहसोहळा पार पडणार आहे. आजवर सोनाक्षीच्या लग्नाच्या फक्त चर्चा होत होत्या, कारण तिने किंवा झहीरने अथवा दोघांच्या कुटुंबियांनी त्याची पुष्टी केली नव्हती. पण आता सोनाक्षी व झहीरच्या लग्नाच्या बातमीवर ज्येष्ठ अभिनेत्री पूनम ढिल्लों यांनी शिक्कामोर्तब केलं आहे.ज्येष्ठ बॉलीवूड अभिनेत्री पूनम ढिल्लों यांनी एका कार्यक्रमाला हजेरी लावली. यावेळी त्यांना सोनाक्षी व झहीरच्या लग्नाबद्दल विचारण्यात आलं, तेव्हा त्यांनी लग्नाची बातमी खरी असल्याची माहिती दिली. "मी सोनाक्षीला खूप साऱ्या शुभेच्छा देते. तिने खूप सुंदर इनव्हाइट पाठवलं आहे. ती फार लहान होती, तेव्हापासून मी तिला पाहिलं आहे आणि तिचा संपूर्ण प्रवास पाहिला आहे. देवाच्या कृपेने ती खूप राहो. ती खूप प्रेमळ मुलगी आहे. तिला आयुष्यात खूप आनंद मिळो याच शुभेच्छा. झहीर तिला नेहमी आनंदी ठेव आणि ती खूप प्रेमळ मुलगी आहे हे लक्षात ठेव," असं पूनम ढिल्लों 'इन्स्टंट बॉलीवूड'शी बोलताना म्हणाल्या.सोनाक्षी आणि झहीरच्या लग्नाच्या पत्रिकेत एक ऑडिओ क्यूआर कोड देण्यात आला आहे. क्यूआर कोड स्कॅन केल्यावर सोनाक्षी आणि झहीरचा इन्व्हिटेशन मेसेज ऐकू येतो. या ऑडिओ मेसेजच्या सुरुवातीला हे दोघे म्हणतात, "आमच्या सर्व, टेक सॅव्ही व गुप्तहेर मित्र-मैत्रिणी आणि कुटुंबियांना हाय!" झहीर पुढे म्हणतो, "गेल्या सात वर्षांपासून आम्ही एकत्र आहोत. आनंद, प्रेम, एकमेकांसोबत हसणं या सगळ्या गोष्टींना आम्हाला या क्षणापर्यंत आणलं आहे."सोनाक्षी पुढे म्हणते, "तो क्षण जेव्हा आम्ही एकमेकांच्या कथित गर्लफ्रेंड-बॉयफ्रेंडच्या पलीकडे जाऊन पुढचं पाऊल उचलतोय." झहीर म्हणतो, "एकमेकांचे अधिकृत पती-पत्नी बनण्यासाठी." यानंतर दोघे एकत्र म्हणतात, "तर तुमच्याशिवाय हे सेलिब्रेशन पूर्ण होणार नाही, म्हणून २३ जूनला तुम्ही जे काही करत आहात ते सोडून आमच्याबरोबर पार्टी करा."सोनाक्षी माझी एकुलती एक मुलगी आहे अन् ती माझ्या खूप जवळ आहे. जर माझ्या मुलीचे लग्न होत असेल तर मी तिच्या निर्णयाला पाठिंबा देईल. सोनाक्षीला तिचा जोडीदार निवडण्याचा अधिकार आहे आणि मी तिच्या लग्नाच्या दिवशी सर्वात आनंदी बाबा असेन," असं शत्रुघ्न सिन्हा म्हणाले.



# 'पुष्पा 2'ला टक्कर द्यायला येतोय 'स्त्री 2'

बॉक्स ऑफिसवर एकाच दिवशी बिग बजेट सिनेमे प्रदर्शित झाले की, नेमका कोणता चित्रपट पाहायचा ही अडचण प्रेक्षकांच्या मनात निर्माण होते. साहजिकच याचा परिणाम चित्रपटांच्या संपूर्ण कलेक्शनवर होतो. गेल्यावर्षी अक्षय कुमारचा 'OMG २' आणि सनी देओलचा 'गदर २' हे दोन्ही चित्रपट एकाच दिवशी प्रदर्शित झाले होते. अर्थात प्रेक्षकांनी दोन्ही चित्रपटांना भरभरून प्रतिसाद दिला. परंतु, 'गदर २'च्या तुलनेत अक्षयच्या 'OMG २'च्या कलेक्शनवर परिणाम झाला. आता अशीच काहीशी परिस्थिती येत्या ऑगस्ट महिन्यात निर्माण होणार आहे. १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, ख्रिसमस, ईद, दिवाळी अशा महत्त्वाच्या दिवशी कोणते सिनेमे प्रदर्शित होणार हे साधारणतः वर्षभरापूर्वीच घोषित केलं जातं. येत्या १५ ऑगस्टला बॉक्स ऑफिसवर मोठी स्पर्धा निर्माण झाली आहे. यापूर्वी रोहित शेट्टी दिग्दर्शित 'सिंघम ३' येत्या १५ ऑगस्टला प्रेक्षकांच्या भेटीला येणार होता. ( नुकत्याच जाहीर केलेल्या तारखेनुसार 'सिंघम ३' दिवाळीत प्रदर्शित होईल ) यामध्ये अजय देवगण, दीपिका पदुकोण, रणवीर सिंह, टायगर श्रॉफ, करीना कपूर खान यांच्या प्रमुख भूमिका आहेत. त्यामुळे 'सिंघम' सीरिजचे चाहते या चित्रपटाची आवर्जुन वाट पाहत आहेत. अशातच दाक्षिणात्य सुपरस्टार अल्लू अर्जुनचा 'पुष्पा २' देखील १५ ऑगस्टला रिलीज होणार असल्याचं निर्मात्यांनी वर्षभरापूर्वीच जाहीर केलेलं आहे.'पुष्पा' चित्रपटाच्या पहिल्या भागाने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला होता. त्यामुळे 'पुष्पा २' सुद्धा रेकॉर्डब्रेक कमाई करेल असा अंदाज कित्येक चित्रपट समीक्षकांनी वर्तवला आहे. यामध्ये अल्लू अर्जुनसह नॅशनल क्रश रश्मिका मंदाना प्रमुख भूमिकेत झळकेल. 'पुष्पा २' आणि 'सिंघम ३' एकाच दिवशी प्रदर्शित झाल्यास कोण बाजी मारणार यावर गेले अनेक महिने चर्चा चालू असतानाच आता या दोन्ही चित्रपटांना टक्कर द्यायला येतोय श्रद्धा कपूरचा 'स्त्री २'. 'मुंज्या' चित्रपटाच्या घवघवीत यशानंतर मॅडॉक फिल्म्सने 'स्त्री २'च्या प्रदर्शनाची तारीख जाहीर केली आहे. हा चित्रपट सुद्धा १५ ऑगस्टला प्रदर्शित होणार आहे. एकाच दिवशी तीन चित्रपट बॉक्स ऑफिसवर धडकल्यास शेवटी बाजी कोण मारणार हे पाहणं उत्सुकतेचं ठरेल परंतु, निश्चितच तिन्ही सिनेमांना याचा काही अंशी फटका बसेल.



## उर्फीची फॅशन पाहून नेटकरी थक्क

कधी लहान मुलांची खेळनी तर कधी बबलगम, कधी कंगवा तर कधी माशांपासून बनवलेला टॉप. ही सर्व फॅशन आहे उर्फी जावेदची. ती नेहमीच तिच्या असामान्य शैली चाहत्यांच्या चकित करत असते. तिची फॅशन ही कल्पनेपलीकडची आहे. उर्फी जावेद ही दररोज कोणत्या ना कोणत्या कारणाने प्रसिद्धीच्या झोतात येते. कधी तिची अतरंगी फॅशन तर कधी तिचे वक्तव्य. या दोन्हीमूळे तिच्यावर टीकीही केली जाते. मात्र या टीकेचा तिच्यावर काहीच फरक पडत नसल्याचं नेहमीच दिसतं. उर्फी प्रत्येक वेळी अशी काहीतरी वेगळी फॅशन करते की ते पाहिल्यानंतर नेटकरी हैराण होतात. यावेळीही उर्फीने अशीच काहीशी फॅशन केली आहे. मात्र यावेळी तिने परिधान केलेल्या ड्रेसचं नेटकरी कौतुक करत आहेत. उर्फी जावेद एक क्रिएटिव्ह ड्रेस परिधान केला आहे. यावेळी उर्फीने 7 कॉलर पिंक ड्रेस घातला आहे. ज्याचे व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या ड्रेसमध्ये ती खूपच सुंदर दिसत आहे या ड्रेससोबतच तिने फ्रेंच स्टाइल हेअरस्टाइल केली आहे. ती मुंबईच्या रस्त्यांवर निघाली तेव्हा ती या लूकमध्ये स्पॉट झाली होती. उर्फी जावेदने हाय हिल्स, हेअर बन आणि न्यूड मेकअपसह तिचा लुक पूर्ण केला होता.

उर्फीच्या क्रिएटिव्हीचं लोक कौतुक करत आहे. तिचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

## गोपी बहू पुन्हा परतणार!

'साथ निभाना साथियाँ' या मालिकेत 'गोपी बहू'ची भूमिका साकारून अभिनेत्री देवोलिना भट्टाचार्जी ही घराघरात पोहोचली. मालिका संपल्यानंतरही देवोलिना विविध कारणांमुळे सोशल मीडियावर सतत चर्चेत असते. देवोलिनाने जीम ट्रेनर शहनवाज शेख याच्यासोबत लग्नगाठ बांधली. यानंतर सोशल मीडियावर तिला खूप ट्रोलही करण्यात आलं. मात्र देवोलिना ही गेल्या काही दिवसांपासून टीव्हीपासून दूर होती. त्यामुळे तिचे चाहते तिला मिस करत होते पण आता लवकरच ती एका नवीन शोसह टीव्हीवर ग्रँड एन्ट्री करणार आहे. 'दिल दियां गल्लां' या टीव्ही शोद्वारे ती मोठ्या पडद्यावर परतणार आहे. या मालिकेत दिशा नावाचे नवीन पात्र दाखवणार आहे जे देवोलिना साकारणार आहे.

# सनीच्या चित्रपटातून डेब्यू करणार होती ऐश्वर्या!



सध्या सनी देओल त्याचा ब्लॉकबस्टर चित्रपट गदर 2 च्या यशाचा आनंद घेत आहे. आता अलीकडे अभिनेता त्याच्या बंद पडलेल्या चित्रपटांबद्दल बोलला. एका चित्रपटाचे नाव 'इंडियन' असल्याचे अभिनेत्याने सांगितले. सनीने सांगितले की, या चित्रपटातील गाणी आणि बहुतांश दृश्यांचे चित्रीकरण झाले. मात्र, हा चित्रपट कधीच प्रदर्शित झाला नाही. वास्तविक, नुकताच सनी देओल टीव्ही न्यूज शो 'आप की अदालत' मध्ये पाहुणा म्हणून दिसला होता, जिथे तो त्याच्या बंद पडलेल्या चित्रपटाबद्दल बोलत होता. सनी म्हणाला- 'मी स्वतः 'इंडियन' चित्रपट बनवत होतो. ऐश्वर्या राय या चित्रपटाचा एक भाग होती, हा तिचा पहिला चित्रपट होता. आम्ही गाणी आणि बहुतांश सीन शूटही केले होते. पण नंतर बजेटची अडचण सुरू झाली, त्यामुळे चित्रपट अखेर बंद झाला. ऐश्वर्या रायने 1997 मध्ये मणिरत्नमच्या 'इरुवर' या तमिळ चित्रपटातून तिच्या अभिनय करिअरची सुरुवात केली होती. त्याच वर्षी अभिनेत्रीने 'और प्यार हो गया' या चित्रपटाद्वारे बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. या चित्रपटात ऐश्वर्यासोबत सनी देओलचा धाकटा भाऊ बॉबी देओल मुख्य भूमिकेत होता. यापूर्वी बॉलीवूड हंगामाला दिलेल्या मुलाखतीत डिझायनर नीता लुल्ला यांनी सांगितले होते की, चित्रपट निर्माते यश चोप्रा यांना 1993 मध्ये आलेल्या डर या चित्रपटात ऐश्वर्या रायला कास्ट करायचे होते, परंतु तसे होऊ शकले नाही.

# नेत्रावळकरच्या कंपनीवर नेटीझन्सची टीका!

## नेत्रावळकर ओरॅकलमध्ये इंजिनीयर म्हणून कार्यरत

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**सौरभ नेत्रावळकर हे नाव सध्या सुरू असलेल्या टी-२० विश्वचषकामध्ये गाजत आहे. सौरभ नेत्रावळकरने आपल्या उत्कृष्ट कामगिरीने लक्ष वेधले आहे. मुंबईत जन्मलेल्या सौरभ हा एक सॉफ्टवेअर इंजिनीयर असून वेगवान गोलंदाजही आहे. भारत वि अमेरिकेच्या सामन्यात सौरभने विराट कोहली आणि रोहित शर्मा या मोठ्या खेळाडूंना बाद करत तीन सामन्यांमध्ये चार विकेट आपल्या नावे केले आहे.**






त्याच्या या कामगिरीमुळे सध्या क्रिकेटप्रेमी तसेच क्रीडा समीक्षकही त्याचे कौतुक करताना दिसत आहे. अमेरिकेकडून क्रिकेट खेळत असला तरी सौरभ अजूनही इंजीनियर म्हणून कार्यरत आहे. मग सामन्यांच्या वेळेला तो काम कसं मॅनेज करतो, याबद्दल त्याच्या बहिणीने माहिती दिली.विराट आणि रोहितच्या विकेटपेक्षाही सर्वाधिक प्रशंसा त्याची पाकिस्तानविरूद्धच्या सामन्यातील कामगिरीमुळे झाली. सौरभने सुपर ओव्हरमध्ये १८ धावांचा बचाव करत अमेरिकेला त्यांच्या क्रिकेट इतिहासातील सर्वात मोठा विजय मिळवून दिला. २००९ चे जेतेपद पटकावलेला पाकिस्तानचा संघ नवख्या अमेरिकेकडून पराभूत झाला. अमेरिकेत ओरॅकल कंपनीमध्ये एक सॉफ्टवेअर इंजीनिअर आणि क्रिकेटपटू अशा दुहेरी भूमिकांचा समतोल साधत नेत्रावळकर कामगिरी करताना दिसत आहे. त्याची बहीण, निधी, हिने सौरभ या दोन्ही भूमिका तो कसा सांभाळतो याबाबत सांगितले.तो खूप भाग्यवान आहे की त्याच्या कारकिर्दीत त्याला नेहमीच साथ देणारे लोक भेटले. त्याला माहित आहे की जेव्हा तो क्रिकेट खेळत नाही तेव्हा त्याला त्याची नोकरी १०० टक्के मेहनत घेऊन करायची आहे. त्यामुळे तो जिथे जातो तिथे तो त्याचा लॅपटोपा घेऊन जातो आणि त्याला कुठूनही काम करण्याचे स्वातंत्र्य आहे," असे निधीने क्रिकेट नेक्स्टला सांगितले. निधीचा भाऊ त्याच्या व्यावसायिक आणि क्रिकेटमधील जबाबदाऱ्या कशा अखंडपणे पार पाडतो, हेही तिने सांगितले. ती पुढे म्हणाली, "जेव्हा तो भारतात येतो तेव्हाही तो त्याचा लॅपटॉप घेऊन येतो, तो काम करत असतो. मॅच झाल्यावर हॉटेलमध्ये पण तो त्याचे काम करतो. त्याच्या कामाप्रतिचे त्याचं समर्पण कौतुकास्पद आहे.सौरभ पूर्णवेळ इंजीनियर आणि अर्धवेळ क्रिकेटपटू यांच्यात समतोल साधत असतो. इतकेच नव्हे तर त्याच्या या कामात त्याची कंपनीही त्याला तितकाच पाठिंबा देते. "तो एक मुंबईकरनेस त्याच्यामध्ये आहे. जो नेहमीच असतो; जी संपूर्ण घाईघाईची संस्कृती आपल्या सर्वांमध्येच आहे," ती पुढे म्हणाली. सौरभ नेत्रावळकरच्या बहिणीने टी-२० विश्वचषकादरम्यान तो हॉटेलमधून काम करत असल्याचा खुलासा केल्यानंतर नेटिझन्सनी आयटी कंपनी ओरॅकलला त्यांच्या 'टॉक्सिक वातावरण' आणि स्पर्धेवर लक्ष केंद्रित करण्यासाठी त्याला सुट्टी न दिल्याबद्दल सुनावले आहे. तर, इतरांनी कार्यालयीन काम आणि क्रिकेटमध्ये समतोल साधण्यासाठी त्याचे कौतुकही केले. सोशल मीडियावर चाहत्यांच्या विविध प्रतिक्रिया समोर येत आहेत. आज म्हणजेच १४ जूनला फ्लोरिडामध्ये होणाऱ्या अमेरिका वि आयर्लंड सामन्यात सौरभ नेत्रावळकर खेळताना दिसणार आहे. हा सामना जिंकत अ गटातून सुपर८ साठी पात्र होण्याची सुवर्णसंधी अमेरिकेकडे आहे.त्याच्या या कामगिरीमुळे सध्या क्रिकेटप्रेमी तसेच क्रीडा समीक्षकही त्याचे कौतुक करताना दिसत आहे. अमेरिकेकडून क्रिकेट खेळत असला तरी सौरभ अजूनही इंजीनियर म्हणून कार्यरत आहे. मग सामन्यांच्या वेळेला तो काम कसं मॅनेज करतो, याबद्दल त्याच्या बहिणीने माहिती दिली. विराट आणि रोहितच्या विकेटपेक्षाही सर्वाधिक प्रशंसा त्याची पाकिस्तानविरूद्धच्या सामन्यातील कामगिरीमुळे झाली. सौरभने सुपर ओव्हरमध्ये १८ धावांचा बचाव करत अमेरिकेला त्यांच्या क्रिकेट इतिहासातील सर्वात मोठा विजय मिळवून दिला

### नोकरी 100 टक्के मेहनत

. २००९ चे जेतेपद पटकावलेला पाकिस्तानचा संघ नवख्या अमेरिकेकडून पराभूत झाला.अमेरिकेत ओरॅकल कंपनीमध्ये एक सॉफ्टवेअर इंजीनिअर आणि क्रिकेटपटू अशा दुहेरी भूमिकांचा समतोल साधत नेत्रावळकर कामगिरी करताना दिसत आहे. त्याची बहीण, निधी, हिने सौरभ या दोन्ही भूमिका तो कसा सांभाळतो याबाबत सांगितले.तो खूप भाग्यवान आहे की त्याच्या कारकिर्दीत त्याला नेहमीच साथ देणारे लोक भेटले. त्याला माहित आहे की जेव्हा तो क्रिकेट खेळत नाही तेव्हा त्याला त्याची नोकरी १०० टक्के मेहनत घेऊन करायची आहे. त्यामुळे तो जिथे जातो तिथे तो त्याचा लॅपटोपा घेऊन जातो आणि त्याला कुठूनही काम करण्याचे स्वातंत्र्य आहे," असे निधीने क्रिकेट नेक्स्टला सांगितले.

# इंग्लंडचा ओमानवर ऐतिहासिक विजय

## टी-20 इतिहासात ही कामगिरी करणारा ठरला पहिला संघ

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**इंग्लंडच्या संघाने शानदार कमबॅक करत सुपर८ फेरीतील शर्यतीत कायम आहेत. अँटिगा येथी सर व्हिव्हियन रिचर्ड्स स्टेडियमवर इंग्लंड आणि ओमान यांच्यातील सामन्यात इंग्लंडने आश्चर्यकारक कामगिरी केली. या सामन्यात त्यांनी ओमानविरुद्ध मोठा विजय नोंदवला, ज्यामुळे ते अजूनही सुपर८ च्या शर्यतीत आहेत. इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करताना ओमानला अवघ्या ४७ धावांत ऑलआउट केले. त्यानंतर ३.१ षटकात ८ विकेट्स राखून लक्ष्याचा पाठलाग केला.**




अशा स्थितीत इंग्लंडच्या भेदक गोलंदाजीसमोर ओमानचे फलंदाज चांगलेच फसले. तो १३.२ षटकांत अवघ्या ४७ धावांवर ऑलआऊट झाला. ओमानकडून शोएब खानने सर्वाधिक ११ धावा केल्या होत्या. इंग्लंडकडून आदिल रशीदने सर्वाधिक ४ विकेट घेतले. याशिवाय मार्क वूड आणि जोफ्रा आर्चरनेही ३-३ विकेट घेतले. ओमानचे फलंदाज ज्या खेळपट्टीवर सतत संघर्ष करताना दिसत होते. त्या खेळपट्टीवर इंग्लंडच्या आघाडीच्या फलंदाजांनी कहर केला. ४८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंड संघाला फारसा वेळ लागला नाही. इंग्लंडने अवघ्या ३.१ षटकांत लक्ष्याचा पाठलाग केला, ज्यामुळे त्यांच्या नेट रन रेटमध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे. कर्णधार जोस बटलरने ३००च्या स्ट्राईक रेटने ८ चेंडूत नाबाद २४ धावा केल्या, त्याने या खेळीत ४ चौकार आणि १ षटकार लगावला. फिल सॉल्टने ३ चेंडूत १२ तर जॉनी बेअरस्टोने २ चेंडूत ८ धावा केल्या. ओमानकडून बिलाल खान आणि कलीमुल्ला यांनी प्रत्येकी १ विकेट मिळवला.ब गटातून ३ पैकी ३ सामने जिंकून ऑस्ट्रेलिया आधीच सुपर८ साठी पात्र ठरला आहे. ३ पैकी २ सामने जिंकल्यानंतर आणि एक सामना पावसामुळे रद्द झाल्यानंतर स्कॉटलंड ५ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. मात्र, इंग्लंडचा ओमानच्या सामन्यापूर्वी स्कॉटलंडपेक्षा चांगला नव्हता. पण आता ओमानवर मोठा विजय नोंदवल्यानंतर, इंग्लंडचा नेट रन रेट (+३.०८१) स्कॉटलंड (+२.१६४) पेक्षा चांगला झाला आहे. मात्र, इंग्लंडचे सध्या ३ सामन्यांतून ३ गुण आहेत.

### 3.1 षटकांत मिळवला विजय

जर त्यांनी त्यांचा पुढील सामना नामिबियाविरुद्ध जिंकला आणि स्कॉटलंडने त्यांचा शेवटचा गट स्टेज सामना ऑस्ट्रेलियाविरुद्ध गमावला तर इंग्लंड सुपर८ साठी पात्र ठरेल.इंग्लंडने ओमानवर अवघ्या ३.१ षटकांत विजय मिळवून मोठा इतिहास रचला. यासह पुरुषांच्या टी-२० विश्वचषक २०२४ त्या इतिहासात ही कामगिरी करणारा पहिला संघ ठरला आहे. टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात इंग्लंडने ओमानवर सर्वाधिक चेंडू शिल्लक ठेवत सर्वात मोठा विजय नोंदवला आहे. त्यांनी १०१ चेंडू शिल्लक असताना सामना जिंकला. याआधी टी-२० विश्वचषकात एवढा मोठा विजय कोणत्याही संघाला नोंदवता आलेला नाही. हा विक्रम यापूर्वी श्रीलंकेच्या नावावर होता. २०१४ मध्ये त्याने नेदरलँडविरुद्ध टी-२० विश्वचषक सामना ९० चेंडू शिल्लक असताना जिंकला होता.